**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४ /सांगली |
| २ | अपीलकर्ता | सौ. सुजाता सुरेश पाटील<br>रा. दुधगाव, ता. मिरज, जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, जि. सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, हातकणंगले, जि. सांगली |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, अपीलकर्त्याने माहिती अर्जात मागितलेल्या माहितीप्रमाणे काही मुद्दयांची माहिती त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ऊर्वरित माहिती दि. १५.५.२००८ पर्यंत देणेचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. ऊर्वरित माहिती दिल्याबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी यांनी दि. ५.६.२००८ अखेर आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. २२.५.२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**राज्य माहिती आयोग, पुणे**

**नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१**

श्री.विनायक काशीनाथ सूर्यवंशी
मु.पो.पांचवड, ता.वाई, जि.सातारा ... अपीलकर्ता

विरुध्द

**अपील क्र.२३९/सातारा**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (आस्थापना),
विकास शाखा, पुणे विभाग, पुणे ... उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी (प्रशासन)
पुणे विभाग, पुणे

**अपील क्र.२४०/सातारा**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जि.प. सातारा ... उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा (१)कार्यकारी अभियंता (ल.पा.बं.)सातारा जि.प.
(२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)सातारा जि.प.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३९ व २४० / सातारा /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विनायक काशिनाथ सूर्यवंशी

मु.पो.पांचवड, ता.वाई, जि.सातारा

**अपील क्र.२३९/सातारा**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (आस्थापना),
विकास शाखा, पुणे विभाग, पुणे श्री.आनंदराव शिवराम जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी (प्रशासन)
पुणे विभाग, पुणे श्रीमती सोनाली घुले

**अपील क्र.२४०/सातारा**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रतिनिधी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.प्र.) जि.प. सातारा
श्री.एस.आर.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा (१)कार्यकारी अभियंता (ल.पा.बं.)सातारा जि.प.
श्री.टी.डी.चिंदके
(२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)सातारा जि.प.
श्री.एस.आर.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.५.२००७ (अ.क्र.२३९)<br>दि.२९.५.२००७ (अ.क्र.२४०) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.६.२००७(अ.क्र.२३९) |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.७.२००७(अ.क्र.२३९ व २४०) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.८.२००७ (अ.क्र.२३९)<br>दि.३१.८.२००७ (अ.क्र.२४०) |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र.२३९/सातारा**

(१) दि.१९.३.२००२ रोजीच्या अपिलांवरील सुनावणीच्या वेळी घेतलेल्या बचावाच्या जबाबाची प्रत.

(२) दि.१९.३.२००२ च्या अपिलांवरील सुनावणीच्या कार्यवृत्तांताची प्रत (प्रोसिडींग) माझी स्वाक्षरी असलेलेची प्रत.

(३) बचावाकरिता सहाय्यभूत ठरणारे अभिलेख कोणत्या नियमाप्रमाणे देता येत नाहीत.

**अपील क्र.२४०/सातारा**

(१) न्यायालयात दाखल केलेल्या अपील नं.४६९/९७ वर दि.३०.१०.२००० रोजी जो निकाल दिलेला आहे त्यामध्ये लेखा परिक्षणास माहिती दिली असा आरोप केलेला आहे. तर मी कोणती माहिती लेखा परिक्षणास दिली. तसेच लेखा परिक्षणास माहिती देणे, हा गुन्हा होतो किंवा कसे. दि.३.३.१९९३ च्या नोटीसीत आरोप नसताना हा नवा आरोप ठेवून जो युक्तिवाद केलेला आहे. ही न्यायालयाची फसवणूक का? करणेत आली व त्या जजमेंटच्या आधारे मला सक्तीने सेवानिवृत्त केले आहे. तरी सक्तीने सेवानिवृत्ती रद्द करणेचा आदेश निघालेला नाही.

(२) दि.७.९.१९९४ ते दि.६.६.१९९५ या कालावधीत कार्यकारी अभियंता यांनी कार्यालयाचे काहीही काम न देता कामाशिवाय बसवून ठेवून, मानसिक छळ केलेला आहे, त्याबाबतची योग्य ती कारणे.

(३) सन १९९१-९२ व १९९२-९३ या वर्षात मागासवर्गीय लोकांच्या पिण्याच्या पाण्याच्या विहीरीवर बसविलेल्या रहाट खरेदीची प्रत्येक रहाटाची किंमत प्रतिनगर किती?

(४) माझे मूळ सेवा नोंद पुस्तकातील नोंदीवरुन दि.१२.७.१९९१ ते ७.९.१९९४ या कालावधीत माझे मुख्यालय कोणते होते.

(५) कार्यकारी अभियंता ल.पा.जि.प. सातारा हे त्यांचे दि.११.९.१९९२ चे पत्रात मी सातारा मुख्यालय समजून केलेली प्रवासभत्ता बिले अनुज्ञेय नसल्याची कळवितात. लघुपाटबंधारे विभगाच्या सन १९९१-९२ च्या लेखा परिक्षणात शक क्र.७/३ मध्ये मी खंडावरुन केलेली प्रवासभत्ते बिले घेता येत नसलेबद्दल शक उपस्थित केला आहे. तरी माझे मुख्यालय कोणते?

(६) सन १९९१-९२ च्या लेखा परिक्षण भाग-२ व शक क्र.३मध्ये नमूद केलेप्रमाणे संबंधितांकडुन जी शासनाची फसवणूक केलेली आहे त्याची वसूली झाली किंवा

कसे तसेच त्यांचेविरुध्द शासनाकडे अहवाल सादर केला किंवा कसे व शासनाने त्यांना काय शिक्षा केली.

(७) लिपीकवर्गीय संवर्गाचे बदलीचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना नसताना माझी बदली खंडाळा येथे दि.१२.७.१९९१ पूर्वी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सातारा यांनी कोणत्या आदेशान्वये केली. कोणतया कारणास्तव केली (प्रशासकीय / विनंतीवरुन)

(८) कार्यकारी अभियंता यांना मी पाठविलेल्या दि.८.७, ६.१० व १९.११.१९९२, ११.२.१९९३ व १२.३.१९९३ च्या माझ्या पत्राच्या झेरॉक्स प्रती मला मिळाव्यात.

(९) लघुपाटबंधारे उपविभाग, खंडाळा, जि.सातारा येथे माझेकडून दि.१२.७.१९९१ ते ६.९.१९९४ अखेर रोखपाल पदाचे काम करुन घेतले आहे, परंतु दि.१७.१०.१९८८ च्या शासन निर्णयातील सर्व अटींची पूर्तता करुनही मला विशेष वेतन दिलेले नाही.

(१०) सन १९९२-९३ गोपनीय अभिलेख बदलून मिळणेबाबत कार्यवाही झालेली नाही ती होणेविषयी विनंती.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.विनायक काशीनाथ सूर्यवंशी यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे विभाग), जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे आपल्या कार्यकाळातील सेवाविषयक बाबींच्या संदर्भात तसेच सक्तीच्या सेवानिवृत्तीविरुध्द झालेल्या चौकशीच्या वेळी उपआयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्यासमोर दिलेल्या जबाबाची प्रत आदी माहिती जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडून मागितली होती. ती न मिळाल्यामुळे श्री.सूर्यवंशी यांनी उपआयुक्त (आस्थापना), विकास, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील केले. याच माहतीसाठी श्री.सूर्यवंशी यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ल.पा.बं.), सातारा जिल्हा परिषद यांच्याकडे अर्ज केला होता. त्यांच्याकडून समाधानकारक माहिती न मिळाल्याने श्री.सूर्यवंशी यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे अपील केले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद श्री.अंकुश बगाटे यांनी काही कागदपत्रांच्या प्रती श्री.सूर्यवंशी यांना देण्याचा आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दिला, तर माहिती दिलेली असल्याचे नमूद करुन उपआयुक्त,

(आस्थापना), विकास शाखा, पुणे विभाग, पुणे यांनी त्यांचे अपील फेटाळले. याविरुध्द श्री.सूर्यवंशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपीले केली आहेत.

श्री.सूर्यवंशी सातारा जिल्हा परिषदेच्या सेवेत होते. नियमानुसार ते दि.३१.१०.२००० रोजी निवृत्त झाले. मात्र त्यांना सक्तीने सेवानिवृत्त केल्याचे पत्र दि.२.२.२००१ रोजी देण्यात आले. ही अन्याय्य कारवाई असल्यामुळे न्याय मिळण्यासाठी आपल्याला माहिती हवी आहे, असे श्री.सूर्यवंशी यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. अनेक आर्थिक लाभ मिळाले नसल्याचे त्यांनी नमूद केले, तसेच आपला मानसिक छळ झाल्याचा आरोपही केला. मात्र श्री.सूर्यवंशी हे जिल्हा परिषद सेवेत कार्यरत असताना, अनधिकृतपणे गैरहजर रहाणे, तक्रार अर्जामध्ये वरिष्ठांबाबत अशोभनीय अशी भाषा वापरणे, कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण करणे, रोखपाल पदाचा पदभार मिळणेबाबत, सातारा मुख्यालय समजून घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता मिळणेबाबत वरिष्ठांकडे थेट पत्रव्यवहार करणे इ. वर्तणूक नियमांचा भंग केल्याने त्यांच्यावर ५ आरोप ठेवून खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आली होती. खातेनिहाय चौकशीमध्ये सर्व आरोप सिध्द झाल्यामुळे त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांचेकडील २.२.२००१ च्या आदेशान्वये जिल्हा परिषद सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे. सदर शिक्षेविरुध्द त्यांनी मा.अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे केलेले अपिलाचे सुनावणीचे वेळी शिक्षेबाबत आरोपनिहाय असे कोणतेही समर्थन केलेले नाही. त्यामुळे त्यांचे अपील दि.१९.८.२००२ चे निर्णयान्वये फेटाळण्यात आलेले आहे. मा.अपर आयुक्त यांच्या सदर निर्णयाच्या विरुध्द त्यांनी शासनाकडेही पुनरिक्षण अर्ज सादर केलेला होता. सदर पुनरिक्षण अर्जावर दि.२२.८.२००५ रोजी निर्णय होऊन श्री.सूर्यवंशी यांचा पुनरिक्षण अर्ज फेटाळण्यात येऊन त्यांना सक्तीने सेवानिवृत्तीची दिलेली शिक्षा शासनानेही कायम केलेली आहे. यावरुन या कार्यालयाची कृती, निर्णय बरोबर असल्याचे सिध्द होत आहे. तसेच याबाबत त्यांनी मा.उच्च न्यायालयात त्यांनी दाखल केलेली रिट याचिका क्र.३९४४/२००१ देखील रिजेक्ट झालेली आहे,' असे उपआयुक्त, (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री.आनंदराव शिवराम जगताप यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी व तोंडी निवेदनात नमूद केले आहे.

सक्तीने सेवानिवृत्त केल्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद यांचा व त्याविरुध्दचे अपील फेटाळण्याचा अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचा आदेश रद्द करावा, अशी मागणी श्री.सूर्यवंशी यांनी केली.

गटविकास अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडील माहिती श्री.सूर्यवंशी यांना देण्यात आली आहे, मात्र जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे), सातारा जिल्हा परिषद यांनी आपल्या अर्जांच्या व इतर काही कागदपत्रांच्या प्रती दिल्या नसल्याचे श्री.सूर्यवंशी यांच्या लेखी व तोंडी निवेदनातून स्पष्ट होते. या प्रती त्वरित द्याव्यात, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रती दि.२१.८.२००७ रोजी पाठविल्याचे व मुख्यालयाची नोंद असलेल्या आदेशाची प्रतही श्री.सूर्यवंशी यांना स्वतंत्रपणे पाठविल्याचे जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी यांनी दि.२९.१०.२००७ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले, मात्र आवश्यक ती सर्व कागदपत्रे ( दि.७.८.१९९२, ६.१०.१९९२, ९.११.१९९२, ११.२.१९९३ व १२.३.१९९३ अन्वये पाठविलेल्या पत्राच्या प्रती प्रमाणित करुन मिळाव्यात.) आपल्याला अद्याप मिळालेल्या नाहीत असे श्री.सूर्यवंशी यांनी दि.१५.१.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले. श्री.सूर्यवंशी यांनी दि.२९.५.२००७ रोजी केलेल्या अर्जानुसार द्यावयाची माहिती देण्यासाठी १५ जानेवारी २००८ उजाडला तरी, म्हणजे जवळजवळ आठ महिने होत आले तरी देण्यात आलेली नाही, असे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरुन स्पष्ट होते. तसेच मुद्दा क्र.५ वगळता आपल्याला कोठलीही माहिती मिळाली नाही, असेही श्री.सूर्यवंशी यांनी सप्रमाण नमूद केले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र ठरतात.

रोखपालपदाचे विशेष वेतन मिळावे, गोपनीय अहवाल बदलून मिळावे, सक्तीच्या सेवानिवृत्तीचा आदेश रद्द करावा, इ.मागण्या श्री.सूर्यवंशी यांनी मूळ अर्जात व अपिलात केल्या आहेत. परंतु हे प्रशासकीय कार्यवाहीचे विषय असून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाहीत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील क्र.२४० मान्य. अपील क्र.२३९ अमान्य.

(२) देय माहिती विहित मुदतीत दिली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (उत्तर विभाग), जिल्हा परिषद, सातारा यांना रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांची त्याबाबतची जबाबदारी निश्चित करुन शास्तीच्या रकमेची त्यानुसार आकारणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी करावी व तसे आयोगास दि.१०.६.२००८ पर्यंत कळवावे.

(३) जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही शास्ती वसूल करुन ती दि.१०.६.२००८ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी करुन, तसेच संबंधितांच्या सेवापुस्तक व गोपनीय अहवालातही नोंदी घेऊन, त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला दि.१५.६.२००८ पर्यंत पाठवावा. या बाबीची पूर्तता करण्याची जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांची राहील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.५.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४२ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्रीमती लतादेवी गोविंदराव पाटील<br>प्लॉट क्र.७ व ८, विद्यानगर, मोरेवाडी, कोल्हापूर-१३ |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपशहर अभियंता, विभागीय कार्यालय क्र.४<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>कोल्हापूर महानगरपालिकेकडे १९९५, १९९६ व २००३ या तिन्ही साली बांधकाम परवानगी मागितली होती, ती मिळाली नाही त्याबाबतची माहिती | |

वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार बांधकाम परवाना संबंधातील मागितलेली माहिती दि. ३१ मे २००८ पूर्वी देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास अपेक्षित असलेली माहिती दि. ३१ मे २००८ पूर्वी दिल्याबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. ३१.५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४५ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. ए. जी. हळींगळे<br>गुरू अपार्टमेंट, जयहिंद कॉलनीजवळ,<br>साकेकर हॉस्पिटलसमोर, विश्रामबाग, सांगली - ४१६ ४१६ |
| ३ | जन माहिती अधिकारी | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हजर होते. श्री. हळींगळे यांनी केलेला माहिती मागणीचा अर्जच तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणला गेला नाही, आवक बारनिशीत नोंदविला गेला नाही. प्रथम अपिलानंतर अपिलीय प्राधिकाऱ्यांनी चौकशी करून श्री. हळींगळे यांच्याकडून मूळ अर्जाची प्रत मागून घेतली व माहिती दिली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सांगली यांनी लेखी नमूद केले आहे. अर्जाची अशा प्रकारे हाताळणी केली जाणे ही गंभीर बाब आहे. त्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांना समज देण्यात येत आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना समज द्यावी. वरील तीनही घटकांनी सादर केलेले निवेदन व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, अपीकर्त्यास अंशतः माहिती दिली आहे व ऊर्वरित माहिती दि. १.६.२००८ पर्यंत देण्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केल्याने व त्यास अपीलकर्त्याने मान्यता दिल्याने आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८, १० ते १७ मधील माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी. मात्र यासाठी येणारा खर्च संबंधित अधिकाऱ्यांनी शासकीय खर्चातून न करता स्वतः भरावा. सदरची कार्यवाही दि. १.६.२००८ पर्यंत पूर्ण करून पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. २२.५.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. अजीत दादा तोरवे<br>मु. पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जत, जि. सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हजर होते. वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, जागेच्या मालकीच्या **व** चुकीच्या नोंदी केल्याबद्दल ग्रामसेवकावर कारवाई करण्याच्या संदर्भात मुख्य तक्रार होती, असे दिसते. अपीलकर्त्यास माहिती दिली आहे व त्यांचे समाधान झाले आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी नमूद केले. आपल्याला माहिती मिळाली असून, समस्येचे निवारण झाले असल्याचे अपीलकर्त्याने नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** २२.५.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**